**महाराष्ट्र शासन**

**औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय**

कामगार भवन, ५ वा मजला, ब्लॉक -ई, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे - पूर्व, मुंबई- ४०० ०५१.

फोन नं. -26572504/09/22/58, फॅक्स नं. - 26572474, Email ID – dirdish.mum-mh@gov.in


माहितीचा अधिकार

क्र.संऔसुवआ/सांख्यिकी/२०२०/ २६६५ /८, दिनांक: २०/०४/२०२०

प्रति,

सर्व कारखान्यांचे भोगवटादार / व्यवस्थापक

विषय:- कारखाने अधिनियम, १९४८च्या कलम ११० खालील महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या नियम ११९(१) अंतर्गत वार्षिक विवरणपत्र (नमुना क्र.२७) सादर करण्यासाठी कारखानदारांना मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ:- शासनाचे पत्र क्र.संकीर्ण२०२०/प्र. क्र. २/काम-४, दिनांक १९ एप्रिल, २०२०

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र कारखाने नियम,१९६३ च्या नियम ११९(१) नुसार कारखानदारांना वार्षिक विवरणपत्र (नमुना क्र.२७) प्रत्येक वर्षाच्या १ फेब्रुवारीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे, त्याप्रमाणे प्रत्येक वर्षी अशी वार्षिक विवरणपत्र कारखानदारांकडून १ फेब्रुवारीपूर्वी सादर केली जातात. सदर वार्षिक विवरणपत्र online प्रणालीने सादर करण्याची सुविधा देखील मागील दोन वर्षापासून उपलब्ध करुन देण्यात आली आहे..

कोविड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र शासनाने संपूर्ण देशामध्ये लॉकडाऊन घोषित केलेले आहे व कारखाने बंद करण्यात आलेले आहेत. त्यामुळे काही कारखानदारांनी सन २०१९ साठीचे वार्षिक विवरणपत्र (नमुना क्र.२७) अद्याप सादर केलेली नाहीत,

सध्या कोरोना (कोविड-१९) विषाणूच्या साथीमुळे वेळोवेळी घोषित करण्यात आलेले लॉकडाऊन व त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती पाहता शासनाकडून संदर्भाधिन पत्रानुसार महाराष्ट्र कारखाने नियम,१९६३ च्या नियम ११९(१) नुसार सन २०१९ करीताचे वार्षिक विवरणपत्र (नमुना क्र.२७) सादर करण्यासाठी कारखानदारांना किमान ३१ जुलै, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता दिली आहे.

तरी संबंधित कारखान्यांचे भोगवटादार / व्यवस्थापक यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या नियम ११९(१) नुसार सन २०१९ करीताचे वार्षिक विवरणपत्र (नमुना क्र.२७) दिनांक ३१ जुलै, २०२० पर्यंत सादर करण्यास मुभा देण्यात येत आहे.

20/4/2020

**डॉ. महेंद्र कल्याणकर (भा.प्र.से.)**

**संचालक**

**औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,**

**महाराष्ट्र राज्य, मुंबई.( अ.का.)**

**प्रत** :- अपर/सह/उप संचालक,

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,

मुंबई/ठाणे/वसई/कल्याण/रायगड/पुणे (कार्यक्षेत्र-१)/अहमदनगर/

पुणे (कार्यक्षेत्र-२)/सोलापूर/पुणे (कार्यक्षेत्र-३)/सातारा/कोल्हापूर/सांगली/

नाशिक/धुळे/जळगांव/औरंगाबाद/नांदेड/अकोला/अमरावती/नागपूर/चंद्रपूर/भंडारा